N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** महात्मा गांधी चौक **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0208 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/06/2022 02:57 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 15/06/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/06/2022

**Time From (वेळेपासून):** 18:51 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:51 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/06/2022 **Time (वेळ):** 02:13 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/06/2022 02:13 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** महात्मा गांधी पोलीस चौकी ,मिरज समोरील रोडवर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. प्रहिंद महादेव कांबळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ढवळी ता मिरज जि सांगली,महात्मा गांधी चौक,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ढवळी ता मिरज जि सांगली,महात्मा गांधी चौक,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक रविशंकर रामचंद्र चव्हाण | | | 1. रिसाला रोड, इंदीरा अपार्टमेंट , सिसनं1487 खणभाग, सांगली,महात्मा गांधी चौक,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,000/ रू. (एक हजार रुपये) | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता. 16.06.2022मी प्रहिंद महादेव कांबळे वय 33 वर्ष व्यवसाय- रिक्षा चालक रा. मु.पो.ढवळी ता.मिरज जि. सांगली मो.नं 9766078005.मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. मी शामराव पवार रा.कुपवाड ता.मिरज जि. सांगली यांचे मालकीची बजाज मक्झीमा कंपनीची रिक्षा रजि.क्र.एम.एच.10 सी. क्यु. 0452 ही रिक्षा भाडयाने चालवण्यास घेवून सांगली, मिरज, कुपवाड या ठिकणी रिक्षामधून प्रवासी वाहतूकीचा व्यवसाय करतो.दि.09.06.2022 रोजी मी सांगली वरून मिरज या ठिकाणी प्रवासी घेवून जात असताना मिशन चौक मिरज या ठिकाणी महात्मा गांधी चौक पोलीस ठाणेचे एएसआय चव्हाण पोलीस यांनी मला हात करून रिक्षा थांबवण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी माझी रिक्षा रोड कडेला थांबवली. चव्हाण पोलीस माझ्याजवळ आले व त्यांनी मोबाईलव्दारे माझ्या रिक्षाचा समोरून फोटो काढला व त्यांनी मला अवैद्य प्रवासी वाहतूकीचा 10,000/- रूपये दंड करणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना मी अवैद्य प्रवासी वाहतूक करीत नसल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी माझी रिक्षा घेवून पुढे निघून जात असताना काही अंतर गेल्यानंतर चव्हाण पोलीस हे मोटर सायकलीवरून पुन्हा माझ्या रिक्षा समोर आले व त्यांनी मोटरसायकल आडवी लावून माझी रिक्षा थांबवली. त्यावळी मी रिक्षामधुन बाहेर जावून त्यांचे जवळ गेलो असता त्यांनी मला रिक्षा गांधी चौकी समोर घेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझ्या रिक्षामधील प्रवासी यांना जाण्यास सांगून माझी रिक्षा बाजूस असलेल्या गांधी चौक येथे असलेल्या पोलीस चौकी समोर लावली. त्यावेळी चव्हाण पोलीस हे माझ्या जवळ आले व त्यांनी मला माझ्या रिक्षावर कारवाई करणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना कारवाई न करण्याबाबत विनंती केली. त्यावर चव्हाण पोलीस यांनी रिक्षावर कारवाई करायची नसेल तर 1500/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. मी त्यांना माझ्याकडे येवढे पैसे नसल्याचे सांगून माझी रिक्षा सोडण्याबाबत विनंती केली. त्यांनी मला काय करणार तु असे विचारून पुन्हा 1500/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले व त्याशिवाय रिक्षा सोडणार नाही असे सांगून त्यांनी माझ्याकडून 500/- रूपये घेतले व उरलेले 1000/- रूपये घेवून येण्यास सांगीतले. मी रिक्षा घेवून जात असताना त्यांनी मला उद्या पैसे घेवून आला नाहीस तर, तुझ्या रिक्षावर कारवाई करणार अशी धमकी दिली. त्यानंतर मी माझी रिक्षा घेवून निघून आलो.एएसआय चव्हाण माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याने व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.09.06.2022 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे हजर होवून श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना माझ्या तक्रारी बाबत सांगीतले होते. घाटगे साहेब यांनी माझी ओळख श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक एसीबी सांगली यांचेशी करून दिली. मी चव्हाण पोलीस यांचे विरूध्दचा माझा तक्रारी अर्ज पुजारी साहेब यांना दिला. पुजारी साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज वाचून त्यावर सही केली. मी दि.10.06.2022 रोजी चव्हाण पोलीस यांना भेटण्यास जाणार होतो त्यामुळे मी माझ्या कामामधून रिकामा

रिक्षावर कारवाई न करण्याकरीता चव्हाण पोलीस यांनी माझ्याकडे 1000/- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. चव्हाण यांनी मला उद्या पैसे घेवून येण्यास सांगीतले असल्याने दि.11.06.2022 रोजी सापळा कारवाई करण्याचे पुजारी साहेब यांनी निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला अँन्टी करप्शन ब्युरो सांगली या ठिकाणी हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझ्याकडील रिक्षाने रवाना होवून अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात हजर झालो. काही वेळानंतर पुजारी साहेब व त्यांचे पथक असे कार्यालयात हजर झाले. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पोना चौगुले यांनी माझे व चव्हाण पोलीस यांचेशी झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार केली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला दि.11.06.2022 रोजी सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास जिल्हा क्रिडा संकुल मिरज या ठिकाणी हजर राहण्याच्या सुचना देवून जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून आलो.

त्यानंतर दि.11.06.2022 रोजी सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास मी माझ्या रिक्षासह जिल्हा क्रिडा संकुल मिरज या इमारतीच्या समोर हजर झालो. त्या ठिकाणी पुजारी साहेब, घाटगे साहेब,दोन्ही पंच व पथक हजर होते. पुजारी साहेब यांनी चव्हाण यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे निश्चित केले. पुजारी साहेबांनी मला लाच रक्कम 1,000/- रुपये हजर करणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी माझे शिल्लक रक्कमेतील 1000/-रुपये, लाच रक्कम हजर केली. त्यावेळी सदर 1000/-रुपयाचे नोटांचे नंबर पुजारी साहेब यांनी एका को-या कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले. त्यानंतर पुजारी साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोना चौगुले यांनी 1000/- रुपये रकमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम माझ्या शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला. मी तो माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. त्यानंतर मी व पंच कनोजे असे माझ्या रिक्षामधून रवाना होवून महात्मा गांधी चौक येथील पोलीस चौकीजवळ गेलो. माझ्या पाठोपाठच पुजारी साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील वाहनाने आमचे काही अंतरावर आले होते. मी माझी रिक्षा पार्क करून मी व पंच कनोजे असे पोलीस चौकीच्या समोर गेलो असता पोलीस चौकी मध्ये तसेच आजूबाजूस चव्हाण दिसून आले नाहीत. मी व पंच कनोजे बराच वेळ वाट बघीतली परंतू चव्हाण पोलीस आले नसल्याने त्यांची भेट झाली नाही. मी व पंच कनोजे त्या ठिकाणावरून निघून पुजारी साहेब थांबले होते त्या ठिकाणी गेलो. पुजारी साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी मी व पंच कनोजे यांनी चव्हाण पोलीस यांची भेट झाली नसल्याचे सांगीतले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी कारवाई तात्पुरती स्थगीत करण्याचे ठरवून चव्हाण पोलीस यांनी पुन्हा रिक्षा आडवून पैशांची मागणी केल्यास तात्काळ संपर्क करण्याबाबत सुचना दिल्या.पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्याकडील अँन्थ्रासिंग पावडर लावून ठेवलेली 1000/- रूपये रक्कम पुजारी साहेबांकडे दिली. पुजारी साहेबांनी सदरच्या नोटा बदलून 1000/- रूपये मला परत केले व मला जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून आलो. त्यानंतर दोन तिन दिवस चव्हाण पोलीस मला पुन्हा दिसले नाहीत.

दि.15.06.2022 रोजी मी मिरज ते सांगली अशी माझ्या रिक्षामधून प्रवासी वाहतूक करीत असताना चव्हाण पोलीस महात्मा गांधी चौक पोलीस चौकी जवळ असल्याचे मला दिसले. मी सांगली वरून मिरजला आल्यानंतर ते मला आडवतील व पैशांची मागणी करतील म्हणून मी पुजारी साहेब यांना संपर्क करून कळविले. पुजारी साहेब यांनी मला सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास जिल्हा क्रिडा संकुल मिरज येथे येण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी जिल्हा क्रिडा संकुल मिरज या इमारतीच्या समोर हजर झालो. काही वेळातच पुजारी साहेब, घाटगे साहेब, दोन पंच व पथक मी थांबलो त्या ठिकाणी आले. पुजारी साहेब यांनी चव्हाण यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे निश्चित केले.

पुजारी साहेबांनी मला लाच रक्कम 1,000/- रुपये हजर करणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी माझे कडील 1000/-रुपये, लाच रक्कम हजर केली. त्यावेळी सदर 1000/-रुपयाचे नोटांचे नंबर पुजारी साहेब यांनी एका को-या कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले. त्यानंतर पुजारी साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोना चौगुले यांनी 1000/- रुपये रकमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम माझ्या शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवली.

त्यानंतर पुजारी साहेबांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला. मी तो माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. त्यानंतर मी व पंच कनोजे असे माझ्या रिक्षामधून रवाना होवून महात्मा गांधी चौक येथील पोलीस चौकीजवळ गेलो. माझ्या पाठोपाठच पुजारी साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील वाहनाने आमचे काही अंतरावर आले होते. माझी रिक्षा पार्क करून मी व पंच कनोजे असे पोलीस चौकीच्या समोर गेलो असता चौकीच्या बाजूस असलेल्या एम आय डी सी रोडवर चव्हाण पोलीस थांबलेले होते. मी व पंच कनोजे असे चव्हाण यांचे जवळ गेलो. मी चव्हाण यांना दोन तीन दिवस दिसला नाही असे म्हणालो असता चव्हाण यानी इथच असल्याचे सांगीतले. चव्हाण यांनी माझ्याकडे पैसे देण्याबाबत हाताने इशारा केला. त्यावेळी मी माझ्या शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवलेली 1000/- रूपये लाच रक्कम माझ्या उजवे हाताने बाहेर काढून चव्हाण यांचे समोर धरली असता चव्हाण यांनी 1000/- रूपये लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठिमागील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर चव्हाण पोलीस यांनी मला "चालु महिन्याच काय करणार ?" असे विचारून पुन्हा पैशांची मागणी केली. त्यावर मी त्यांना माझ्या रिक्षामध्ये सिंगल सिट भरणार असल्याचे सांगीतले. त्यावर चव्हाण पोलीस यांनी मला "दे की त्याला काय होतय" असे म्हणून त्यांनी त्यांचे उजवे हाताचे तीन बोटे दाखवून "बाकीचे एवढ देत्यात" असे म्हणून माझ्याकडे पुन्हा पैशांची मागणी केली. तसेच चव्हाण यांनी मला "एक दोन घालयचे त्यात, एवढ किती परवडणार, भारती हॉस्पीटल ते स्टँड पर्यत, जरी दोन चार सिटा केल्या तर हजार बाराशे रूपये मिळत्यात" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना रिक्षात सिंगल सिटच भरणार असल्याचे सांगीतले. तेवढ्यात एक दुसरे पोलीस कर्मचारी आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. त्यांनी बाजूस असलेल्या मोटर सायकलवर बसून मोटरसायकल सुरू केली चव्हाण पोलीस हे देखील त्यांचे पाठीमागे मोटरसायकलीवर बसले. चव्हाण पोलीस अनोळखी पोलीस कर्मचारी यांचे सोबत मोटरसायकलीवरून जावू लागले. चव्हाण यांनी मला जाण्यास सांगून अडचण आल्यास कॉल करण्यास सांगीतले. लागलीच मी माझ्या डावे हाताने माझ्या उजव्या हाताच्या शर्टच्या बाह्या वर करून लाच स्विकारले बाबत पुर्वनियोजीत इशारा केला. लागलीच पुजारी साहेब, पंच बनसोडे व पथक असे माझ्या जवळ आले. पुजारी साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी पंच कनोजे यांनी तसेच मी आमचे समोरून मोटरसायकलीवरून गेलेल्या पोलीस कर्मचा-यांपैकी मोटर सायकलच्या पाठिमागील बाजूस बसलेले व खांद्यावर एक स्टार असलेले पोलीस हे चव्हाण एएसआय असून त्यांनी माझ्याकडून लाच स्विकारल्याचे सांगीतले. लागलीच पुजारी साहेब यांनी मला जागेवर थांबण्याबाबत सांगून पुजारी साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने चव्हाण पोलीस यांचे पाठोपाठ गेले.

काही वेळाने पुजारी साहेब,दोन्ही पंच व सापळा पथक असे चव्हाण पोलीस तसेच त्यांचे सोबत असलेले पोलीस कर्मचारी यांना सोबत घेवून मी थांबलो होतो त्या ठिकाणी आले. पुजारी साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्यास सांगून वाहनामध्ये अंधार करुन माझे हात व कपडे

तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशाचे तोंडास व आतील बाजुस अँन्थ्रासिन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात जावून थांबण्याबाबत सांगीतले. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्याकडील रिक्षाने त्या ठिकाणावरुन निघून अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर झालो. काही वेळानंतर पुजारी साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे चव्हाण यांना सोबत घेवून कार्यालयात आले. त्यावेळी पुजारी साहेब यांनी मला बाहेर थांबण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर थांबलो. पुजारी साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यांनतर थोड्यावेळाने पुजारी साहेबांनी मला बाहेरुन त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले. त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर मला कार्यालयाच्या बाहेर जावून थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने पुजारी साहेब यांनी मला बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळयाची सविस्तर हकीकत सांगीतली. पुजारी साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला. सदर कारवाई दरम्यान चव्हाण पोलीस यांचे पुर्ण नाव रविशंकर रामचंद्र चव्हाण, सहाय्यक पोलीस फौजदार, महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे. रा. फ्लॅट नं 9, इंदिरा अपार्टमेंट, खणभाग सांगली असे असल्याचे मला समजले आहे.

दि.09.06.2022 रोजी रविशंकर रामचंद्र चव्हाण, सहाय्यक पोलीस फौजदार, महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे यांनी मी चालवत असलेली रिक्षा आडवून माझ्या रिक्षावर कारवाई न करण्याकरीता त्यांनी माझ्याकडे 1500/- रूपये लाचेची मागणी करुन 500/- रूपये लागलीच स्विकारुन उर्वरीत 1000/- रूपये घेवून येण्यास सांगून दि.10.06.2022 रोजी माझ्याकडे लाचेची मागणी करुन दि.15.06.2022 रोजी 1000/- रूपये लाच रक्कम माझ्याकडून स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

हा दिला वर्दी जबाब,

ठाणे अंमलदार
महात्मा गांधी चौक
पोलीस ठाणे, मिरज

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** raviraj anil phadnis(SI (Sub-Inspector)) / 15101000402rapm8601g **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): raviraj anil phadnis
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402rapm8601g

ठाणे अंमलदार
महात्मा गांधी चौक
पोलीस ठाणे, मिरज